No. TPS. 1715/1956/CR-99/15/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of Shriwardhan (First Revised) for the area of Shriwardhan Municipal Council (hereinafter referred to as 'the said Municipal Council') has been sanctioned by the Director of Town Planning , Maharashtra State *vide* his Notification No. D.P. SHRIWARDHAN(R)/TPV-III/34, dated, 4th January 1988 under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as ' the said act ') and came in force with effect from 25th April 1988 ;

And whereas, the said Municipal Council (hereinafter referred to as " the said Planning Authority ") *vide* its General body Resolution No. 562, dated 20th January 2011 made a declaration of its intention to prepare Revised Development Plan (Second Revised) under Section 38 read with Section 23(*1*) of the said act for the area within its jurisdiction and a notice to that effect has been published at page No. 33 of the *Maharashtra Government Gazette*, Part-II, dated 9-15 June 2011 ;

And whereas, the said Planning Authority after carrying out survey of the lands within its jurisdiction, prepared the Draft Revised Development Plan of Shriwardhan (Second Revised) (hereinafter referred to as " the said Draft Revised Development Plan ") and decided to publish the same *vide* its resolution No.337, dated 6th December 2013 and published a notice to that effect in the daily local newspaper namely 'Sagar' and 'Lokmat'on dated 8th December 2013 and in *Maharashtra Government Gazzette* dated 12-18 December 2013 on page No. 12 and 13. In accordance with the provisions of sub-section (*1*) of Section 26 of the said Act ;

And whereas, Maharashtra Regional and Town Planning (second amendment) Act, 2010 (Mah. X of 2011) was published in the *Maharashtra Government Gazette* dated 5th April 2011 ;

And whereas, the Planning Committee appointed under Section 28(*2*) of the said Act, after considering the objections and suggestions to the said Draft Revised Development Plan received within the stipulated period and has submitted its report to the said Planning Authority ;

And whereas, the said Planning Authority considered the report of Planning Committee including the objections and suggestions received thereon and *vide* Special General Body Resolution No.520, dated 5th December 2014 made certain modifications under Section 28(*4*) in the said Draft Revised Development Plan and granted its approval to submit the said modified Draft Revised Development Plan to the Government for final sanction under Section 30(*1*) of the said Act ;

And whereas, in exercise of the powers conferred under Section 30(*1*) of the said Act, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Order No.D.P. Shriwardhan/Sec.30/CR-256/TPV-III/4058, dated 25th July 2014 has extended the period for submitting the said Draft Revised Development Plan to the Government upto and inclusive of date 11th December 2014 ;

And whereas, the said Municipal Council has submitted the said Draft Revised Development Plan to the State Govt. on 8th December 2014 under sub-section (*1*) of Section 30 of the said Act, for its sanction ;

And whereas, in accordance with sub-section (*1*) of Section 31 of the said Act, the Government, after examining the proposals of the said Draft Revised Development Plan and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, has decided to sanction a part of the said Draft Revised Development Plan subject to some modifications as shown in schedule-I (excluding the substaintial

modifications, Excluded Portion i.e. EP-1 to EP-24 as specified in schedule appended to Notice No. TPS-1715/1956/CR-99/15/UD-12, dated the 7th June 2016) ;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*1*) of section 31 of the said Act and all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby ,–

(*a*) Accords its sanction to the said Draft Revised Development Plan (Second Revised) partly with Schedule of modifications appended hereto as Schedule-I (excluding the said Excluded Portion i.e. EP-1 to EP-24 described in schedule-II appended with the Notice No. TPS-1715/1956/CR-99/15/UD-12, dated the 7th June 2016) subject to the Notes given below.

(*b*) Extends the period for sanctioning the said Draft Revised Development Plan under Section 31 of the said Act, upto and inclusive of 7th June 2016.

(*c*) The Development Plan of Shriwardhan sanctioned by the Government with modifications shown in schedule-I (excluding the said Excluded Parts numbered as EP-1 to EP-24) shall come into force after one month from the date of publication of this Notification in the *Official Gazette*.

Notes—

1. Areas of reserved sites mentioned in the report of the said Draft Revised Development Plan are approximate and subject to actual measurement on site as per the boundaries shown on the final Development Plan.

2. All the existing roads whether shown on the final Development plan or not, shall have the status of existing public road.

3. The private or rental premises designated in public / semi public zone shall continue to be in such zone as long as public/semi public user exists. Otherwise, the Chief Officer, Shriwardhan Municipal Council shall allow development permission on such lands, considering adjoining major land use zone after due verification and with prior approval of the Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

4. Draftsman errors which are required to be corrected as per actual situation on sites/ or as per survey records, sanctioned layout etc., shall be corrected by the Chief Officer, Shriwardhan Municipal Council, after due verification and with prior approval of the Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

5. Development of lands, Reservations & Roads within CRZ area (seashore, creek, mangroves, mangroves buffer zone etc.) shall be _

(*a*) subject to the Coastal Regulation Zone Notification issued by the Ministry of Environment and Forest, Government of India dated 19th February 1991 and 6th January 2011 and as modified by the Government of India from time to time.

(*b*) subject to the Coastal Zone Management Plan.

(*c*) subject to the clearance of the Maharashtra Costal Zone Management Authority or National Costal Zone Management Authority as the case may be.

The copy of the said Development Plan, as sanctioned by the Government *vide* this Notification shall be kept open for inspection of general public during office hours on all working days, for the period of two years in the office of the Chief Officer, Shriwardhan Municipal Council, Shriwardhan.

Schedule-I

Schedule of Modification

Sr. No.	Modification No. and Proposal as Published under section 26 of MR and TP Act, 1966	Land Details	Proposal Submitted under section 30 of MR and TP Act, 1966	Sanctioned by the State Government under section 31 of MR and TP Act, 1966
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1	M-2/7 Wadi land	S.No. 211 Part	The land is proposed to be deleted from Wadi Land and included in Low Density Residential Zone.	Reinstated in Wadi Land as per Draft Revised Development Plan. published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown on plan.
2	M-2/11 Wadi land	S.No. 155 Part	The land is proposed to be deleted from Wadi Land and included in Low Density Residential Zone.	Reinstated in Wadi Land as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P.Act, 1966 as shown on plan.
3	M-2/14 Wadi land	S.No. 186 Part	The land is proposed to be deleted from Wadi Land and included in Low Density Residential Zone.	Reinstated in Wadi Land as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P.Act, 1966 as shown on plan.
4	M-2/15 Wadi land	S.No. 183 Part	The land is proposed to be deleted from Wadi Land and included in Low Density Residential Zone.	Reinstated in Wadi Land as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown on plan.
5	M-3/4 Agriculture Zone	S.No. 196 Part	The land is proposed to be deleted from Agriculture Zone and included in Residential Zone.	Reinstated in Agriculture Zone as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown on plan.
6	M-4 Wadi land	S.No. 226 Part	The land is proposed to be deleted from Wadi Land and included in Residential Zone.	Reinstated in Wadi Land as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown on plan.
7	M-6/1 Site No. 19 'Beautification of lake and garden'	Part area of Site No. 19 'Beautification of lake and garden'	The land is proposed to be deleted from reservation Site No. 19 -'Beautification of lake and garden'and included in Residential Zone .	Reinstated in Site No. 19 'Beautification of lake and garden' as per Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown plan.
8	M-6/2 Site No. 22- 'Parking'	Plot No.312 in gaothan.	The land is proposed to be deleted from reservation Site No. 22 - 'Parking'and included in Residential Zone .	Site No. 22 - 'Parking' is reinstated as per Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. act, 1966 as shown on plan.
9	—	Site No. 34 'Play-Ground'	—	The open user permissible in Town Hall such as 'Congregation of people for public gathering' is permissible in this Site No. 34 'Play Ground'.
10	M-6/5 Site No. 7:- Animal Husbandary'	Site No. 7:- 'Animal Husbandary'	Site No. 7:- 'Animal Husbandary' is designated as 'Animal Husbandary and Municipal Kondwada'	Sanctionas proposed under Section 30 of MR&TP Act, 1966 as shown on plan.

(1)	(2)	(3)	(4)	(5)
11	M-8 Agriculture Zone	Part area of S.No. 119 to 123, 143 to 145	The lands are proposed to be deleted from Agriculture Zone and included in Wadi lands.	Sanction as proposed under Section 30 of MR&TP Act, 1966 as shown on plan.
12	M-9 12.00 m. wide Roads	—-	All 12.00 m wide proposed roads in the Draft D.P are to be modified and shown as 9.00 m wide roads as shown on plan.	Reinstated as 12.00 m wide roads as per Draft Revised Development Plan published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 as shown on plan.
13	—-	Land of Radha Krishna Mandir	—-	Land of existing Radha Krishna Mandir is shown as Existing as per Existing Land Use Plan.
14	Regulation published for Wadi Land is as follows: (*a*) Permissible F.S.I. shall not be more than 0.04. (*b*) Maximum built up area shall not exceed 100 sq.m. (*c*) No. of storey shall not be more than G+1.		Regulation for Wadi Land is deleted.	Reinstated as published under Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 .

This notification is also available on the Government Website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ASHOK K. KHANDEKAR,

Section Officer.

नगरविकास विभाग

४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी २०१७

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस. १२१२/८०८/प्र.क्र.४५/१३/नवि-१२.—ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम १५ मधील तरतुदीनुसार शासन अधिसूचना क्र. टीपीएस. १२९७/१०९४/ प्र.क्र.११६/९७/नवि-१२, दिनांक २३ सप्टेंबर १९९९ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १ डिसेंबर १९९९ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मौ. वशेरे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ४पै., ९, १०, ११पै., १३पै., १५पै., १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २९पै., ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५२, ५३, ५४, ५८पै., ६२, ६५, ६७ या जमिनी (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त जमिनी " असा करण्यात आला आहे.) हरित परिमंडळ-१ (जी-१) या वापर विभागात समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनी औद्योगिक विभागात समाविष्ट करण्याची विनंती मेसर्स रेनायसंस इंडस इन्फ्रा प्रा.लि. या कंपनीने शासनास केली आहे. (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त कंपनी " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त कंपनीची विनंती विचारात घेऊन तसेच आवश्यक ती चौकशी केल्यानंतर शासनाने उक्त जमिनी हरित परिमंडळ-१ (जी-१) विभागातून वगळून अटींसापेक्ष औद्योगिक विभागात समाविष्ट करण्याबाबतची उक्त अधिनियमातील कलम २०(३) ची सूचना क्र. टीपीएस. १२०८/२३९/प्र.क्र.२२२/०८/नवि-१२, दिनांक २१ ऑगस्ट २००९ रोजी आम जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे, जी **शासन राजपत्रात** दिनांक १० ते १६ सप्टेंबर २००९ रोजी पृ. क्र. ३ ते ५ वर प्रसिद्ध झाली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) आणि प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती/किंवा सूचनांवर संबंधिताना सुनावणी देऊन अहवाल शासनास सादर करणेकरिता तत्कालिन उप संचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त अधिकारी " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाखालील उक्त जमिनींचे एकूण क्षेत्र सुमारे १००.४८ हे. आर इतके असून, यापैकी सुमारे २७.६० हे. आर क्षेत्राची जमीन उक्त कंपनीच्या ताब्यात/मालकीच्या नाहीत ;

आणि ज्याअर्थी, उक्त कंपनीने त्यांच्या ताब्यात/मालकीच्या असलेल्या सुमारे ७२.८८ हे. आर क्षेत्रासाठीच्या वापर बदलासाठीच्या अधिमूल्याचा भरणा शासनास केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त कंपनीच्या ताब्यात/मालकीच्या नसलेल्या सुमारे २७.६० हे. आर क्षेत्राच्या वापर बदलासाठीचे अधिमूल्य भरण्यास तयार असल्याचे व सदरचे क्षेत्र कंपनीकडून संपादित न झाल्यास या वापर बदलाकरिता भरण्यात आलेल्या अधिमूल्याची शासनाकडे परत मागणी करणार नसल्याचे, या जमिनीसंदर्भात कोणत्याही स्वरूपाचा वाद उद्‌भवल्यास त्यास उक्त कंपनी सपूर्णपणे जबाबादार राहील व या संपादित न झालेल्या जमिनीकरिता १२.०० मी. रुंदीचा पोहोचमार्ग उपलब्ध करून देण्याचे नोंदणीकृत हमीपत्र (Undertaking-*cum*-Indemnity Bond) उक्त अर्जदार कंपनीने शासनास सादर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त कंपनीने त्यांच्या ताब्यात/मालकीच्या नसलेल्या सुमारे २७.६० हे. आर क्षेत्राच्या जमिनीच्या वापर बदलासाठीच्या अधिमूल्याचा भरणा केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त कंपनीने शासनास सादर केलेले नोंदणीकृत हमीपत्र (Undertaking-*cum*-Indemnity Bond) तसेच उक्त अधिकारी यांचा अहवाल विचारात घेतल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर तसेच आवश्यक ती चौकशी केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल काही बदलांसह व अटींसापेक्ष अंतिमतः मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, आता, शासन उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) मधील तरतुदीनुसार व अन्य तरतुदीनुसार प्राप्त असलेल्या अधिकारान्वये प्रस्तावित फेरबदलास काही बदलांसह व अटींसापेक्ष मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक २३ सप्टेंबर १९९९ च्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे :—

नोंद—

मौ. वशेरे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नं. ४पै., ९, १०, ११पै., १३पै., १५पै., १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २९पै., ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५२, ५३, ५४, ५८पै., ६२, ६५, ६७ पैकी गावठाणापासून २०० मी. अंतरामध्ये येत असलेल्या जमिनी वगळून उर्वरित जमिनी हरित परिमंडळ-१(जी-१) या वापर विभागातून वगळून खालील अटींसापेक्ष औद्योगिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहेत.

अटी —

(१) उक्त कंपनीच्या ताब्यात नसलेल्या जमिनींना किमान १२.०० मी. रुंदीचा पोहोच रस्ता उक्त कंपनीने उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

(२) उक्त कंपनीने उद्योग सुरू करण्यापूर्वी वॉटर (प्रिव्हेंशन ॲण्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन) ॲक्ट, १९७४ आणि एअर (प्रिव्हेंशन ॲण्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन) ॲक्ट, १९८१ या अधिनियमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ अन्वये उक्त कंपनीने पर्यावरण विभागाकडून आवश्यक तो ना हरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

(३) नदी, नाला, कॅनॉल, तलाव इत्यादी जलस्त्रोतापासून नियमानुसार आवश्यक असलेले अंतर सोडण्यात यावे.

(४) प्रदूषणाचा त्रास होऊ नये याकरिता योग्य ती आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि पर्यावरण रक्षण उपाययोजना संबंधित कंपनीने स्वखर्चाने उभारणे आवश्यक राहील.

(५) प्रस्तावित जमिनीमध्ये पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण (Rain Water Harvesting) व सांडपाणी पुनर्प्रक्रिया (Waste Water Recycling) करण्याची सुविधा कंपनीने स्वखर्चाने करणे आवश्यक राहील.

(६) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मान्यतेने उक्त कंपनीने औद्योगिक व अनुज्ञेय पूरक वापराकरिता आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा, पायाभूत सुविधा स्वखर्चाने विकसित करणे आवश्यक राहील.

(७) उक्त कंपनीने त्यांच्या उक्त जमिनींच्या हद्दीलगत २३ मी. रुंद बफर क्षेत्र ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये नियमानुसार वृक्ष लागवड करण्यात यावी.

(८) प्रकल्पातील विद्यमान वहिवाटीचे रस्ते व प्रादेशिक योजनेतील रस्ते सर्वसामान्य जनतेसाठी खुले ठेवण्यात यावेत.

(९) उक्त जमिनींमध्ये औद्योगिक व अनुज्ञेय वापराकरिता (ancillary uses) आवश्यक असणाऱ्या सुविधा क्षेत्राचे स्वखर्चाने नियोजन करण्याची आणि त्या पुरविण्याची जबाबादारी उक्त कंपनीची राहील.

(१०) उक्त कंपनीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/उद्योग विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

(११) उक्त जमिनीमध्ये केवळ विनाप्रदूषणकारी तथा विनाघातक औद्योगिक वापर अनुज्ञेय राहतील.

(१२) शासनाकडे भरणा केलेल्या अधिमूल्याचा परतावा करण्यात येणार नाही.

(१३) महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या अधिसूचनांमधील तरतुदींनुसार व यामध्ये वेळोवेळी केलेल्या/होणाऱ्या सुचनांच्या अनुषंगाने, उक्त कंपनीने संबंधितांकडून आवश्यक त्या परवानग्या घेणे आवश्यक राहील.

(१४) कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग क्र.१, भातसानगर यांच्या दिनांक ९ एप्रिल २००५ च्या पत्रामधील सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

(१५) राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाचे पत्र क्र.२१-६९/२००८/१अे/III, दिनांक १६ नोव्हेंबर २००९ च्या पत्रामधील सर्व अटीचे पालन करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

(१६) फेरबदला अंतर्गतच्या एकूण क्षेत्रापैकी २७.६० हे. आर क्षेत्राची मालकी/ताबा उक्त कंपनीकडे नाही. सदर क्षेत्राचे भूसंपादन ह्या अधिसूचनेच्या दिनांकापासून १ वर्षात उक्त कंपनीने न केल्यास, अशा जमिनी पुन्हा त्या मूळ विभागात समाविष्ट होतील. म्हणजेच त्या हरित-१ (जी-१) या वापर विभागात समाविष्ट राहतील व त्यासाठीची शासनास जमा केलेली अधिमूल्याची रक्कम उक्त कंपनीस परत मिळणार नाही.

२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

३. मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा दोन महिन्यांच्या कालावधीसाठी खालील नमूद कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील :—

(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे .

(३) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(४) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे .

४. सदरची अधिसूचना ही विभागाच्या *www.maharashtra.gov.in* वेबासाईटवर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अशोक का. खांडेकर,
कार्यासन अधिकारी.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Main Building, 4th Floor, Mantralaya,Mumbai 400032, dated 9th February 2017.

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1212/808/C.R.-45/13/UD-12.— Whereas, the Government has sanctioned the Regional Plan for the Mumbai Metropolitan Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") *vide* Notification No. TPS 1297/1094/CR-116/97/UD-12, dated the 23rd September, 1999 as per the provisions of Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which has come into force with effect from 1st December1999 ;

And whereas, in the said Regional Plan, the lands bearing Survey No.4(pt.), 9, 10, 11(pt.), 13(pt.), 15(pt.), 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 29(pt.), 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 45, 46, 47, 48, 49, 50, 52, 53, 54, 58(pt.), 62, 65, 67of village Vashere, Tal. Bhiwandi, Dist. Thane (hereinafter referred to as " the said lands ") are included in Green Zone-1 (G-1) ;

And whereas, M/s Renaissance Indus Infra Pvt. Ltd., (hereinafter referred to as " the said Company ") has requested the Government to include the said lands in Industrial Zone ;

And whereas, considering the request of the said Company and after making necessary enquiries, Government has issued a notice No.TPS-1208/239/C.R.222/08/UD-12, dated the 21st August 2009, regarding the change of zone of the said lands from Green Zone-1 (G-1) to Industrial Zone under section 20(*3*) of the said Act which appeared in *Maharashtra Government Gazette* on 10-16th September 2009 at pages 3 to 5 (hereinafter referred to as " the Proposed Modification") and appointed the then Deputy Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai as an officer to hear the suggestion/or objections which may received and submit his report to Government (hereinafter referred to as " the said officer ") ;

And Whereas, the total area of the said lands under the Proposed Modification is approx 100.48 Ha. Are., out of which the said Company is not in the possession/ownership of the land admeasuring approx. 27.60 Ha. Are. ;

And Whereas, the said Company has paid the amount of premium to the Government in leiu of conversion of zone of lands which are in the possession/ownership of the said Company having an area approx. 72.88 Ha. Are.;

And Whereas, the said Company has submitted the Registered Undertaking Cum Indemnity Bond to the Government stating that the said Company is ready to pay the premium for the lands admeasuring area approx. 27.60 Ha. Are. which are not in possession/ownership of the said Company and assured the Government that, if the aforesaid lands are not acquired by the said Company, the said Company will not claim for refund of the premium paid for the zone conversion, also, if any disputes or claims arise in future the said Company will be solely responsible for the same, as well as company will provide 12.00 mtr. wide access to the lands which are not acquired by the said Company;

And Whereas, the said Company has paid the premium for the lands having area approx. 27.60 Ha. Are. which are not in the possession /owenership of the said Company ;

And Whereas, considering the Registered Undertaking Cum Indemnity Bond submitted by the said Company to the Government, report of the said officer and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and also making necessary enquiries,the Government is of the opinion that it is necessary to finally sanction the Proposed Modification with some changes and conditions ;

Now therefore, in exercise of the powers confferred under sub-section (*4*) of section 20 of the said Act, the Government hereby, finally sanctions the Proposed Modification with some changes and conditions and for that purpose amends the notification dated 23rd September 1999 sanctioning the said Regional Plan by inserting the following new entry after the last entry ;

ENTRY

The lands bearing S. No. 4(pt.), 9, 10, 11(pt.), 13(pt.), 15(pt.), 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 29(pt.), 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 45, 46, 47, 48, 49, 50, 52, 53, 54, 58(pt.), 62, 65, 67of village Vashere, Tal. Bhiwandi, Dist. Thane, excluding the area falling within the 200 mt. from Gaothan, are deleted from Green Zone-1 (G-1) and included in Industrial Zone subject to followings conditions ;

Conditions—

(*i*) The said Company should provide road having minimum width of 12.00 Mt. to the lands which are not in the possession of the said Company.

(*ii*) The said Company, before starting industrial use, shall take permission from the Maharashtra Polution Control Board under the Water (Prevention and Control of Pollution) Act, 1974 and the Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981. It shall be binding on the said Company to obtain the necessary No Objection Certificate from the Environment Department as per the Environmental Impact Assessment Notification-2006, under the Environment (Prevention) Act, 1986.

(*iii*) The required distance from the river, nalas, canals, lakes shall be kept as per the Development Control Regulations.

(*iv*) It shall be binding on the said Company to provide the pollution control systems and to take necessary steps for Environment prevention with modern Technology at its own cost.

(*v*) It shall be binding on the said Company to provide the system of Rain Water Harvesting and to provide the system of Waste Water Recycling, for reuse of the used water, at its own cost.

(*vi*) With approval of the Maharashtra Polution Control Board, the said Compay shall provide the basic infrastructure and other amenities for the Industrial and permissible ancillary use, at its own cost.

(*vii*) The said Company shall provide 23 mt. wide Buffer Area within the said lands. The plantation as per the Regulation shall be done in the Buffer Area.

(*viii*) The public roads and other rights (Vahivat)/Regional Plan roads in the said lands shall be kept open for the general public.

(*ix*) The planning and providing of the amenity area for the Industrial and permissible ancillary use in the said lands shall be done by the said Company at its own cost.

(*x*) The said Company shall obtain the No Objection Certificate from the Maharashtra Polution Control Board/ Department of Industries.

(*xi*) Only non polluting and non hazardous industrial use are permissible on the said lands.

(*xii*) The premium paid by the said Company for the change of zone will not be refunded.

(*xiii*) As per the provisions of the notification issued by Environment and Forest Ministry, Government of India and the Environment Department of the State Government, as amended from time to time, the necessary permission from the concerned shall be obtained by the said Company.

(*xiv*) The conditions mentioned in the letter of Executive Engineer, Bhatsa Irrigation Division No. 1, Bhatsanagar dated 9th April 2005 shall be binding on the said Company.

(*xv*) The conditions mentioned in the Environment Department's letter No.21-69/2008/1A/III, dated 16th November/2009 shall be binding on the said Company.

(*xvi*) Out of the total area under the change of Zone, an area admeasuring approx. 27.60 Ha. are. is not in ownership /possession of the said Company. If the aquisition of the such area is not completed within one year from the date of this Notification bu the said Company, then such lands will revert to its original position, i.e. in Green Zone-1(G-1) and the amont of premium paid by the said Company to the Government will not be refunded to the said Company.

2. The date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazzette is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

3. The part plan showing the sanctioned modification shall be kept for inspection of the general public during office hours on all working days at the following offices for the period of two months :-

(1) The Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai.

(2) The Collector, Thane.

(3) Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(4) Assistant Director of Town Planning, Thane Branch, Collector Office, Court Naka, Thane.

4. This Notification shall also be available on the Govt. website *www. maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ASHOK K. KHANDEKAR,
Section Officer.

नगरविकास विभाग

४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ डिसेंबर २०१६

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टिपीएस. १७१४/२३३२/प्र.क्र.३०९/१६/नवि-१२.—ज्याअर्थी, खोपोली शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१७९९/ ३०७/प्र.क्र. १२५/९९/नवि-१२, दिनांक ३१ मार्च २००३ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१७९९/३०७/प्र.क्र. १२५/९९/नवि-१२, दिनांक २९ ऑक्टोबर २००४ रोजी मंजूर झाली असून दिनांक १ डिसेंबर २००४ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेसाठी खोपोली नगरपरिषद हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे जिचा उल्लेख " उक्त नियोजन प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. शिळ, ता. खालापूर येथील स.नं. १४, हि.नं. २, सि.स.नं. २२१३, क्षेत्र १५१९० चौ.मी. ही जमीन ना-विकास, विभागात समाविष्ट आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३९, दिनांक १० मे २०११ अन्वेय उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करून, उक्त जमीन " रहिवास विभाग " यामध्ये समाविष्ट करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून, त्यासंबंधीचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक २० ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलाचा प्रस्ताव नियोजनाच्या दृष्टीकोनातून योग्य नसल्याने नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल नामंजूर करीत आहे.

२. सदरची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

३. सदर अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अशोक का. खांडेकर,
कार्यासन अधिकारी.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 26th December 2016.

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1714/2332/CR-309/16/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the city of Khopoli (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been partly sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1799/307/C.R. 125/99/UD-12, dated the 31st March 2003 (hereinafter referred to as " the said Notification ") and has come into force with effect from 14th May 2003 and excluded part of the said Development Plan has been sanctioned by the Government in the Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1799/ 307/C.R.125/99/UD-12, dated the 29th October 2004 and has come into force with effect from 1st December 2004 ;

And whereas, the Khopoli Municipal Council is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as " the, said Planning Authority ") ;

And whereas, in the said Development Plan, an area admeasuring 15190 sq. mt. bearing S.No. 14, H. No.2, C.S. No. 2213 of Village Shil, Tal. Khalapur (hereinafter referred to as " the said land ") is included in No Development Zone ;

And whereas, the said Planning Authority, *vide* its General Body Resolution No. 39, dated 10th May 2011, resolved to include the said land in " Residential Zone" by carrying out a Modification to the said Development Plan and after following all the legal formalities stipulated under section 37(*1*) of the said Act, has submitted a proposal to the Government for it's sanction *vide* letter dated 20th August 2011 (hereinafter referred to as " Proposed Modification ") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that, in planning point of view the Proposed Modification is not suitable and therefore the modification proposal requires to be rejected.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*2*) of section 37 of the said Act, the State Government hereby refuses to accord sanction to the Proposed Modification.

2. This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of The Chief Officer, Khopoli Municipal Council, Khopoli on all working days for a period of one month.

3. This Notification shall also be published on the Government Website at *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ASHOK K. KHANDEKAR,
Section Officer.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th February 2017.

RECTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

Read.—Government Order No. TPS-1216/UOR-77/16/UD-12, dated 14th October 2016

No. TPS-1216/UOR-77/C.R. 414/16/UD-12.— Whereas, the Government in the Urban Development Department, has issued Order No. TPS-1216/UOR-77/16/UD-12, dated the 14th October 2016 under section 160 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as ' the said Act') and ceases the function of the CIDCO as New Town Development Authority for the ara in the Villages *viz.* Kalundre, Devicha Pada, Kamothe, Chal, Tondhare, Kalmboli, Khidukpada, Pale Khurd, Asudgaon (pt), Tembhode (pt), Walvali (pt), Padghe (pt) and Roadpali (pt), and Retained the Municipal Corporation of the city of Panvel as the Planning Authority for the same ;

And whereas, the Vice-President and Managing Director, CIDCO *vide* his letter dated 3rd January 2017 has pointed out that the aforesaid notification dated 14th October 2016 ceases the powrs of CIDCO under section 160(1), 160(2)(*a*). 160(2)(*b*) and 160 (2)(*c*) of the said Act, due to which CIDCO is not able to dispose off the plots or acquire any area necessary for the development in larger public interest, prohibits CIDCO to carry out development of projects which are necessary for the public purpose ;

Now, therefore, in the light of the letter of the Vice-President and Managing Director, CIDCO dated 3rd January 2017, the Government in public interest seems it necessary to make the corrections in the Notification No. TPS-1216/UOR-77/16/UD-12, dated 14th October 2016 which are being issued as follows :—

Corrections :—

Sr. No.	In Place of	Read as
(1)	(2)	(3)
1	And whereas, Government finds it expedient that the CIDCO shall cease to function as New Town Development, Authority for the area in the Villages *viz.* Kalundre, Devicha pada, Kamothe, Chal, Tondhare, Kalmboli, Khidukpada, Pale Khurd, Asudgaon (pt), Tembhode (pt), Walvali(pt), Padghe(pt) and Roadpali(pt), and that the said Corporation shall be the Planning Authority for the same ;	And whereas, Government finds it expedient that the CIDCO shall cease to its .function as the Planning Authority for the area in the Villages *viz,* Kalundre, Devicha pada, Kamothe, Chal, Tondhare, Kalmboli, Khidukpada, Pale Khurd, Asudgaon(pt), Tembhode (pt), Walvali (pt), Padghe (pt) and Roadpali(pt), and that the said Corporation shall be the Planning Authority as per the provisions of section 2(15)(*a*) and 2(19) of the said Act, for the same ;
2.	Now, therefore, in exercise of the powers conferred under section 160 of the said Act and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that—	Now, therefore, in exercise of the powers conferred under the said Act and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares and directs that—

Sr. No.	In Place of	Read as
(1)	(2)	(3)
3.	(*iii*) the CIDCO ceases to function as New Town Development Authority for the area in the Villages *viz.* Kalundre, Devicha Pada, Kamothe, Chal, Tondhare, Kalmboli, Khidukpada, Pale Khurd, Asudgaon(pt), Tembhode(pt), Walvali(pt), Padghe(pt) and Roadpali (pt), and the said Corporation shall be the Planning Authority for the same ;	(*iii*) the said Corporation shall exercise the powers of the Planning Authority under chapter III and IV of the said Act, as a Planning Authority and the CIDCO ceases to exercise powers of the Planning Authority for the area in the Villages *viz.* Kalundre, Devicha pada, Kamothe, Chal, Tondhare, Kalmboli, Khidukpada, Pale' Khurd, Asudgaon (pt), Tembhode (pt), Walvali (pt), Padghe (pt) and Roadpali (pt). (*iv*) the said Corporation shall obtain No objection Certificate from CIDCO, before giving development permissions and occupancy certificate in so far as the recovery of the lease premium, delayed payment charges, etc. (*v*) the CIDCO shall continue to function as the New Town Development Authority for the work of acquiring, developing and disposing of lands, carrying out developments, etc.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ASHOK K. KHANDEKAR,
Section Officer.

नगरविकास विभाग

४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी २०१७

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस. १२१५/२३३३/वियोकडोंमनपा/प्र.क्र.११२/१५/नवि-१२.—ज्याअर्थी, कल्याण-डोंबिवली शहराच्या सेक्टर-३ ची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१२०८/२८८४/प्र.क्र. १३९/०९/नवि-१२, दिनांक ४ एप्रिल २०१२ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १ जून २०१२ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे बारावे, ता. कल्याण येथील स.नं. २७ पैकी, ५२ पैकी व स.नं. ५५ पैकी या जमिनी (यापुढे जिचा उल्लेख " उक्त जमिनी " असा करण्यात आला आहे.) आ.क्र. १६८ प्राथमिक शाळा या आरक्षणात समाविष्ट आहेत (यापुढे जिचा उल्लेख " उक्त आरक्षण " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या योजनेच्या अनुषंगाने राज्य शासनाने सन २०१५ ते २०१९ या कालावधीमध्ये मुंबईमध्ये सुमारे ११ लाख व उर्वरित राज्यामध्ये सुमारे ६ ते ७ लाख घरे बांधण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे आणि त्यास अनुसरून म्हाडाने ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील काही जागा निवडून त्या जमिनीवर म्हाडासाठी परवडणारी घरे बांधण्याची योजना असून त्या अनुषंगाने उक्त जमिनी उक्त आरक्षणामधून वगळण्याची विनंती उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, यांनी शासनास दिनांक १० सप्टेंबर २०१५ च्या पत्रान्वये केले आहे ;

आणि ज्याअर्थी, म्हाडाचा प्रस्ताव विचारात घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त जमिनी उक्त आरक्षणामधून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणे आणि त्याकरिता उक्त अधिनियमातील कलम ३७(१कक) प्रमाणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील उप-कलम (१कक) अन्वये प्रस्तावित फेरबदलासंदर्भात शासनाच्या नगर विकास विभागाने क्रमांक टीपीएस-१२१५/२३३३/प्र.क्र. ११२/१५/नवि-१२, दिनांक ३ सप्टेंबर २०१६ अन्वये आम जनतेच्या हरकती/सूचना मागविण्यासाठीची सूचना (नोटीस) **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणीमध्ये ६ सप्टेंबर २०१६ रोजी पृष्ठ क्र. १२ व १३ वर प्रसिद्ध केली आहे आणि विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतीवर संबंधितांना सुनावणी देऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे म्हणणे ऐकून घेऊन शासनास अहवाल सादर करण्याकरिता सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची अधिकारी (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त अधिकारी " असा करण्यात आला आहे.) म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियुक्त अधिकारी यांचा सादर अहवाल विचारात घेऊन आणि संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल अंतिमतः काही बदलासह मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे उप-कलम (१कक)(सी) व त्यानुषंगाने प्राप्त अधिकारात शासन प्रस्तावित फेरबदल काही बदलासह मंजूर करीत आहे व त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक ४ एप्रिल २०१२ च्या अधिसूचनेतील फरेबदलांच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

नोंद

" भाग नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली शहराच्या सेक्टर-३ च्या मंजूर विकास योजेमधील आ.क्र. १६८-प्राथमिक शाळा हे आरक्षण वगळण्यात येत आहे व असे वगळलेले क्षेत्र म्हाडाच्या परवडणाऱ्या घरांसाठी रहिवास विभागत समाविष्ट करण्यात येत आहे. "

उपरोक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरिता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(२) आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे.

सदरची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* वेबसाईटवर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अशोक का. खांडेकर,
कार्यासन अधिकारी.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 9th February 2017

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1215/2333/DPKDMC/C.R.-112/15/UD-12.— Whereas, the Development Plan of sector-3 of the Kalyan-Dombivali City (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter'referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1208/2884/CR-139/09/UD-12, dated the 4th April 2012 (hereinafter referred to as the " the said Notification") which has come into force with effect from 1st June 2012 ;

And whereas, in the said Development Plan, land bearing S. No. 27(pt), 52(pt) and 55(pt) of village Barave, Taluka Kalyan (hereinafter referred to as " the said lands") is reserved for Site No. 168-Primary School, (hereinafter referred to as " the said Reservation ") ;

And whereas, considering scheme of Central Government of Housing for all upto 2022, the State Government has decided to construct approx. 11 lakhs houses in Mumbai and approx. 6 to 7 lakhs in rest of Maharashtra and as such MHADA has selected some lands in Thanes, Palghar and Raigad District for construction of Affordable Housing for MHADA and the Vice President and Chief Executive Officer, MHADA has requested Government to delete the said lands from the said Reservation *vide* letter dated 10th September 2015 ;

And whereas, after considering the proposal of the MHADA and after making necessary enquiry, Government felt it necessary that the Site No.-168 Primary School in the Development Plan of sector-3 of the Kalyan-Dombivali, may be deleted from the said Reservation and shall be included in Residential Zone, (hereinafter referred to as " the proposed modification ") by following the procedure laid down under section 37(*1AA*) of the said Act ;

And whereas, the Notice regarding the proposed modification was published under sub-section (*1AA*) of the section 37 of the said Act, inviting suggestions/objections from the general public *vide* Urban Development Department. Notice. No TPS-1215/2333/CR-156/13/ UD-12, dated 3rd September 2016 which appeared in *Maharashtra Government Gazette,* Part-I Konkan Division dated 6th September 2016 at Page No. 12 & 13 and the Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai was appointed as an officer (hereinafter referred to as " the said officer ") to hear the suggestions/objections in respect of the proposed modification received within the stipulated period and the say of Kalyan-Dombivali Municipal Corporation and to submit his report to the Government .

And whereas, after considering the report submitted by the said officer and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to accord sanction to the proposed modification with some changes ;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*lAA*)(*c*) of section 37 of the said Act, the Government hereby accords sanction to the proposed modification with some changes and accordingly amends the said Notification dated 4th April 2012 as follows :—

After the last entry in the Schedule of modifications sanctioning the said Development Plan following new entry shall be added.

ENTRY

" Site No. 168- Primary School in the Development Plan of sector -3 of the city of Kalyan-Dombivali, is deleted and the land thus released is included in Residential Zone for Affordable Housing for MHADA as shown on plan. "

Part plan showing the aforesaid sanctioned modification is kept open for inspection by the general public in the offices of the following officers for the period of one month—

(1) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(2) The Commissioner, Kalyan- Dombivali Municipal Corporations, Kalyan.

(3) Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

This Notification is available on the Government website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASHOK K. KHANDEKAR,
Desk Officer.

नगरविकास विभाग

४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी २०१७

आदेश

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस-१७१६/३४१६/स.नं. १३९ब(पै)/प्र.क्र.९/१७/नवि-१२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे.) चे कलम ३१(१) अन्वये पेण शहराची सुधारित विकास योजना संचालक नगररचना महाराष्ट्र. राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक डी.पी. पेण (आर)/२८-८५/टीपीव्ही-३/८३६५, दिनांक १६ डिसेंबर १९८८ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १ मार्च १९८९ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, सोबतच्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मौजे पेण, ता. पेण येथील सर्व्हे क्र. १३९ब/२अ व महसूल विभागाकडील फेरफार क्र. ९९९४ नुसार स.नं. १३९ ब ६ क्षेत्र ०.३७७ हे. आर. (यापुढे " उक्त जमीन " असे संबोधिले आहे.) " आरक्षण क्र. ३०-प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " आणि " आरक्षण क्र. ३१-दवाखाना " याकरीता (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिले आहे.) आरक्षित आहे ;

आणि ज्याअर्थी, पेण नगरपालिकेने (यापुढे " उक्त नगरपालिका " असे संबोधिले आहे.) उक्त जागा विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षांच्या कालावधीत संपादन केली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ नुसार, नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त नगरपालिकेवर दिनांक २० मार्च २०१३ रोजी सूचना बजावून उक्त जागा उक्त नगरपालिकेने विहीत कालावधीत संपादन केली नसल्याचे कळविले होते ;

आणि ज्याअर्थी, वरीलप्रमाणे उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वये सूचना बजावल्यानंतर, उक्त नगरपालिकेने विहीत १ वर्षाच्या मुदतीत उक्त जागा संपादन केली नसल्याचे नमूद करून, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याचे अधिसूचित करणे आवश्यक असल्याचे नमूद करून उक्त अधिनिमाच्या कलम १२७(२) आदेश निर्गमित करण्याची विनंती उक्त नगरपालिकेने शासनास दिनांक १९ डिसेंबर २०१५ च्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, आता त्यानुरुप उक्त आरक्षण उक्त जागेपुरते व्यपगत झालेबाबत अधिसूचित करणे आवश्यक आहे ;

आता, त्याअर्थी, राज्य शासन पेण शहराच्या सुधारित विकास योजनेमधील " आरक्षण क्र. ३०-प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " आणि " आ.क्र. ३१ दवाखाना " ही आरक्षणे उक्त जमिनीपुरती (खालील परिशिष्टामध्ये विस्तृतपणे दर्शविल्याप्रमाणे) व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे मुक्त झालेली जागा विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे जमिनमालकास विकासाकरिता उपलब्ध होईल ;

आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, पेण नगरपालिका, पेण यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत ठेवण्यात आली आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	मौजे, तालुका व जिल्हा	सर्व्हे क्रमांक	विकास योजनेमधील आरक्षण
(१)	(२)	(३)	(४)
१	मौ. पेण, ता. पेण, जिल्हा रायगड	सर्व्हे क्र. १३९ ब/२अ व महसूल विभागाकडील फेरफार क्र. ९९९४ नुसार स.नं. १३९ब६	" आरक्षण क्र. ३०-प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " (भागशः) आणि " आरक्षण क्र. ३१-दवाखाना " (भागशः) (नकाशात दर्शविल्याप्रमाणे)

प्रस्तुतचे आदेश, महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अशोक का. खांडेकर,
कार्यासन अधिकारी.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 9th February 2017

Order

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1716/3416/S. No. 139B(pt.)/CR-9/17/UD-12.— Whereas the Director of Town Planning, Maharashtra State Pune *vide* Notification No. D.P.Pen(R)/28-85/TPV-III/8365, dated the 16th December 1988, has approved the Revised Development Plan of Pen Town (hereinafter referred to as " the said Development Plan ") under section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") and the same has come into force with effect from date the 1st March 1989 ;

And whereas, in the said Development Plan, part of the land admeasuring 0.377 Hectare of Mauje Pen, Tal. Pen of Survey No. 139B/2A and as per Revenue Department's Pherphar No. 9994, S. No. 139B6 more particularly described in the Schedule appended hereto (hereinafter referred to as " the said land ") is reserved partly for ' Site No.30-Prirmary School and Play Ground ' and partly for ' Site No. 31-Dispensary ' (hereinafter referred to as " the said reservations ") ;

And whereas, the said land has not been acquired by the Pen Municipal Council (hereinafter referred to as " the said Municipal Council ") within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the owner of the said land had, issued a notice dated 20th March 2013 under section 127 of the said Act, to the said Municipal Council, being the Planning Authority, informing that the said land had not been acquired by the said Municipal Council, within the stipulated period ;

And whereas, even after service of the said notice as aforesaid, the said land was not acquired within the stipulated period of one year from the date of the service of said notice under section 127 of the said Act, by the said Municipal Council ;

And whereas, the said Municipal Council has requested Government to notify the lapsing of the reservations to the extent of the said land under section 127(*2*) of the said Act *vide* letter dated 19th December 2015 ;

And whereas it is accordingly expedient to notify that the said, reservations, to the extent of the said land has been lapsed.

